# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| अ. क्र | पोलीस ठाणे | गुरनं कलम | गु. घ. ता. वेळ ठिकाण | गु. दा. ता वेळ | फिर्यादी | आरोपी | अटक ता. वेळ | गेलेला माल | मिळाला माल | घ/भेट देणारे अधि. | तपास | खुलासा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सातारा | गु.र.न. 41 /2022 कलम 498(अ), 323,504, 506,34 भादंवि | घ.ता.वेळ व ठिकाण- सप्टेंबर 2016 ते दि.25/08/2021 जवाहर कॉंलनी औरंगाबाद | दि. 12/02/22रोजी 18.34 वा | महिला फिर्यादी औरंगाबाद | 1) कुणाल मिलिंद बनकर 2) महिला आरोपी 3) मिलिंद सांडु बनकर 4) महिला आरोपी 5) महिला आरोपी 6) विशाल मिलिंद बनकर सर्व रा. जवाहर कॉंलनी | | | | | पोउपनि सोनवणे | यातील फिर्यादी यांनी जा.क्र.भरोसा सेल/अर्ज वर्ग बाबत/ 2022-19 दि. 06/01/2022 अन्वये पत्र प्राप्त झाल्याने चौकशी करुन फिर्यादीचे सांगणे प्रमाणे यातील आरोपी तांनी सप्टेंबर 2016 ते दि.25/08/2021 पर्यत फिर्यादीस सारसच्या लोकांनी घरात किरकोळ काणांवरुन वाद घालुन शिवीगाळ फिर्यादीचे विरुध्द खोटे नाटे सांगुन भडकावुन देऊन फिर्यादीस मारहाण करण्यास भाग पाडुन, शारिरीक व मानसिक छळ केला. फिर्यादीचा व तिच्या मुलीची कोणत्याही प्रकारची जबाबदारी न घेता , तुझ्या वडीलांचे जागेवर नोकरी ला लाग व तुझ्या वडीलांचे मिळकती मध्ये हिस्सा घे तरच नांदायला ये, नाही तर फिर्यादीचे पतीचे दुसरे लग्न करुन देण्याची धमकी देऊन छळ केला आहे.. वगैरे मचकुराचे अर्जावरुन मा.पो.नि.सो यांचे आदेशाने डि.ओ.अधिकारी पोउपनि सोनवणे यांनी गुन्हा दाखल |
| 2 | वेंदातनगर | गुरन21/2022कलम 408,420, 511 भादंवि | दिनांक 12.01.2022 रोजी दुपारी 01.04 वाजता 207 लाभ चेंबर्स, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद | दि12/02/2022वेळ 14.48 वा | विजय रामदास सक्करवार वय-45 वर्षे, व्यवसाय- बांधकाम व्यवसायीक, पैठणरोड, ईटखेडा औरंगाबाद | बाबासाहेब बाळासाहेब डुकरे रा. जालाननगर, औरंगाबाद | | 24,00,000/- रुपयांची फसवणुक करण्याचा प्रयत्न | | | पो.उपनि/ मुढे यांचे कडे दिला. | यातील फिर्यादी यांच्या मे अमृत डेव्हल्पर्स बांधकाम व्यवसायात हिशोबनीस म्हणून कामासाठी असलेला आरोपी याने सलग पंधरा-सोळा वर्ष कामासाठी राहुन विश्वास संपादन करुन फिर्यादीच्या ऑफिस मधील स्टेट बँक ऑफ इंडीया बँकेचा धनादेश क्रमांक 406671 पासून 406695 पर्यंतची सिरीज लबाडीच्या ईराद्याने हस्तगत करुन विश्वासघात केला व त्यातील धनादेश क्रमांक 406674 चा दिनांक 12.01.2022 रोजी देवगिरी सहकारी बँक लि. औरंगाबाद या बँकेत 24,00,000/- रुपयांचा धनादेश वटविण्यासाठी वापर केला, म्हणून फिर्यादीची फसवणुक करण्याच्या इराद्याने चेकबुक घेणाऱ्या आरोपी त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. गुन्हा दा |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | वेंदातनगर | गुरन 22/2022 कलम 65 (ई) म.दा.का. | दि.12.02/2022रोजी 14.50वा.सु. राजीवनगर उड्डानपुलजवळ औरंगाबाद | दि12/02/2022 वेळ 17.54 वा | बाळासाहेब दिलीप ओवांडकर वय 30 वर्षे, व्यवसाय- शा. नौकरी पोकॉ/2808 नेमणुक पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर | महिला आरोपी रा. औरंगाबाद | | 900=00 रुपये किंमतीच्या 15 देशी दारु भिंगरी | | | सफौ/जाधव यांचे कडे दिला करीता नोंद | खुलासा - नमुद तारीख,वेळी व ठिकाणी यातील आरोपी ही दिनांक 12.02.2022 रोजी 14.50 वाजेच्या सुमारास राजीवनगर, रेल्वेस्टेशन परिसरातील उड्डानपुलाखाली सार्वजनिक रोडवर येथे अवैधरित्या देशी दारुची बेकायदेशीर चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने वरील वर्णनाचा माल ताब्यात व कब्जात बाळगताना मिळून आल्याने त्याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम 65 (ई) प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. म्हणुन डी.ओ. पोउपनि/पाटील यांचे आदेशाने गुन्हा दाखल करुन मा.पो.नि.सो. यांचे आदेशाने पुढील तपास कामी सफौ/जाधव यांचे कडे दिला करीता नोंद. |
| 4 | वाळुज | 45/2022 कलम 379, 511 भादवि | दि.11/02/2022 रोजी दुपारी 05.45 वा.ठिकाण अंबर वाडीकर कॉलेज वाळुज ता गंगापुर | दि.12/02/2022 वेळ 01.35 | खंडु काशिनाथ जोशी वय-38 वर्षे, धंदा- सेक्युरीटी ड्युटी (अंबर वाडीकर इंजीनीअरींग कलेज) रा. आर.एक्स-5/21 बजाजनगर औरंगाबाद | नसीब महम्मद शेख वय 35 वर्ष धंदा शेती व दोन मुले सर्व रा. अंबर वाडीकर कलेज जवळ वाळुज टोलनाका ता. गंगापुर | | लोखंडी गज अंदाजे 15 फुट 16mm वजन अंदाजे 12ते 13 किलो वजनाचा किमंत अंदाजे 200/- रुपये | | | पोउपनि एल.डी.उंबरे | नमुद दिनांकास वेळी व ठिकाणी दोन लहान मुले वय अंदाजे 12 ते 15 वर्षाचे हे लोखंडी गज अंदाजे 15 फुट 16mm वजन अंदाजे 12ते 13 किलो वजनाचाकिमंत अंदाजे 200/- रुपये असणारा गज हे चोरीच्या उद्देशाने उचलुन बैलगाडी मध्ये टाकतांना अढळले मी त्यांना जावुन पकडले व झालेली घटनेबद्दल आमचे सुरक्षा अधिकारी मुंडे यांना माहीती दिली त्यांनी ती माहीती पोस्टे वाळुजला फोन द्वारे दिली असता सदर ठिकाणी वाळुज टु मोबाईल येवुन त्यांनी समंधीत दोन मुले व ईसम नामे नसीब महम्मद शेख वय 35 वर्ष धंदा शेती रा. सदर समंधित ईसम व दोन मुले यांना टु मोबाईल मध्ये गजासह घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन आम्हाला काही तक्रार असल्यास पोलीस ठाणे येथे येवुन द्यावी असे सांगीतले तरी कलेजच्या पाठीमागील मोकळ्या जागेतुन चोरीच्या इराद्याने लोखंडी गज घेवुन जातांना पकडलेल्या मुलावर व ईसमावर कायदेशिर कार्यवाही करावी माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.म्हणुन गुन्हा दाखल |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | वाळुज | 46/2022 कलम 420 भादवि | दि.12/02/2022वेळ 05.45 ठिकाण अजवानगर, वाळुज, ता. गंगापूर जि. औरंगाबाद | दि.12/02/2022 वेळ 15.43 | संदीप हरीभाऊ बीडकर, वय 32 वर्ष, धंदा नौकरी पोशि/1091 नेमणुक गुन्हे शाखा,औरंगाबाद शहर. | संजय भागीनाथ जाधव | | MH 20 CF 5120 असा असुन (जीचा खरा व मुळ नोंदणी क्रमांक MH 20 CF 5120) व जीचा चेसीस क्र. MBLHA10EZBHM67827 व इंजिन क्र. HA10EFBHM83191 असा असलेले जु.वा.कि.अ. 15,000 00 एकुण | | | पोह/751 मालोदे | नमुद दिनांकास वेळी व ठिकाणी आम्ही व सोबत पो.उप नि.श्री.सानेटक्के साहेब, सफौ जवखेडे, पोना/1555 म्हसके, पोशि/2922 धुळे नेम गुन्हे शाखा औरंगाबाद शहर असे शासकीय वाहन क्र.MH 12 PT 7769 या वाहनाने पो.स्टे एम.वाळुज गुरंन 114/2021 कलम 379 भादवी मधील आरोपीचा शोध घेत असताना 05.05 वा बाबा पेट्रोल पंप येथे आलो असता पोउपनि श्री. सोनटक्के साहेब यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, अजवानगर,वाळुज येथील एक इसम नामे संजय भागीनाथ जाधव हा चोरीच्या मोटार सायकल वर बनावट क्रमांक टाकून वापरत असुन सदरची मोटार सायकल ही त्याच्या घरासमोर उभी असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी सफौ जवखेडे साहेब यांनी दोन पंचाना बोलावून घेवून बातमीच्या ठिकाणी पंचासह 05.45 वाजता गेलो असता एक इसम बातमीतील वर्णना प्रमाणे मो.सा.चालु करुन निघत असताना त्यास आम्ही थांबवले. व त्यास पोउपनि श्री. सोनटक्के साहेब यांनी पोलीस पथकाचा, पंचाचा परिचय देवून येण्याचा उददेश कळवून त्याचे नाव गाव विचारले असता,त्याने त्यांचे नाव संजय भागीनाथ जाधव,वय 55 वर्ष रा.अजवानगर, वाळुज,ता गंगापूर जि.औरंगाबाद असे सांगितले.त्याच्या ताब्यातील हिरो होंडा कंपनीची स्पेल्डर प्लस मो.सा. क्रमांक MH20CM6379 बाबत व गाडीचे कागदपत्रा बाबत विचारपुस केली असता त्याने सांगितले की, माझ्याकडे नमुद गाडीचे कोणतेही कागदपत्र नाहीत. नमुद मोटार सायकलचा खरा आर.टी.ओ नोंदणी क्रमांक MH 20 CF 5120 असा असुन (जीचा खरा व मुळ नोंदणी क्रमांकMH20CF5120)वजीचा चेसीस क्र. MBLHA10EZBHM67827 व इंजिन क्र.HA10,EFBHM83191 असा असलेले जु.वा.कि.अ 15,000 00 एकुण खोटा नंबर टाकुन तो खरा असल्याचे भासवुन शासनाची दिशाभुल व फसवणुक करुन वापरत असताना मिळुन आला.गुन्हा |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | मुकुंद वाडी | गुरनं 41/2022 कलम 384 भा द वि | दिनांक 12/02/2022 रोजी 15.29 वा. एपी आय कॉर्नर हॉस्पिटल जवळील गजानन वाईन मार्ट | दिनांक 12/02/2022 रोजी 19.07 वा | गोविंद राधेशाम जैस्वाल, वय 34 वर्षे, धंदा- खाजगी नोकरी (वाईन शॉप मॅनेजर), रा. गोकुळ नगर, जाधववाडी, औरंगाबाद | दिलीप रामदास चाबुकस्वार वय48 वर्ष धंदा- समाजसेवा रा. ब्रीजवाडी औरंगाबाद. | | | | | पोउप नि ाळे | नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी पोस्टेला येवुन लेखी तक्रार दिली की, यातील आरोपी हे फिर्यादी यांचे वाईन शॉप बाबत एक्साईज (राज्य उत्पादन शुल्क ) विभागात खोट्या तक्रारी देत असुन तुम्ही मला 25000/- रु. द्या अन्यथा मी राज्य उत्पादन शुल्क विभागात सारख्या खोट्या तक्रारी देत राहील किंवा उपोषणाला बसेल असे सांगुन फिर्यादी यांचेकडन पैश्याची मागणी केली म्हणुन गुन्हा दाखल |
| 7 | सिटी चौक | गु.र.न.49/2022 कलम 324,323, 504,506, 34 भा.द.वि | दि. 12/02/2022 रोजी17.00 वा.फिर्यादीचे घरासमोर, काला दरवाजा रोड,नोबल मोटर ड्रायव्हींग शाळेजवळ देवडी बाजार औरंगाबाद येथे | दि. 12/02/2022 रोजी 21.20 वा. दाखल | सय्यद अजीज पाशा पि.सय्यद मोहमद इब्राहीम वय- 55 वर्षे धंदा- ड्रायव्हर रा.घर क्र.1-15-71,काला दरवाजा रोड,नोबल मोटर ड्रायव्हींग शाळेजवळ देवडी बाजार औरंगाबाद. | 1)सय्यद कलीम पिता सय्यद अब्दुल हमीद वय-अंदाजे 33 वर्षे धंदा- मेकॅनीक रा.देवडी बाजार काला दरवाजा रोडऔरंगाबाद 2)सय्यद मुस्तकीम पिता सय्यद अब्दुल हमीद वय-अंदाजे 26 वर्षे धंदा- मेकॅनीक रा.सदर 3)सय्यद मुज्जमील पिता सय्यद अब्दुल हमीद वय- अंदाजे 19 वर्षे रा.सदर | | | | | पोह/345 राठोड | खुलासा:- नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे नात्याने मामा व भाचे असुन फिर्यादीचे नातवंडास रागावल्याचे कारणावरुन फिर्यादी हा आरोपीचे आईस समजावण्यासाठी गेला असता यातील आरोपीनी फिर्यादीस हाताबुक्कयाने मारहाण केली व आरोपी क्र.2 व 3 यानी फिर्यादीचे हात धरले व आरोपी क्र.1 याने त्याचे हातातील लोखंडी चाकुने फिर्यादीचे उजवे डोळयाचे वर कपाळावर तसेच नाकावर मारले त्यामुळे फिर्यादीचे कपाळावर जखम होवुन रक्त निघाले तसेच उजवे हातावर व कंबरेवर मुका मार लागला तसेच आरोपीनी फिर्यादीस शिवीगळ करुन जीवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल करुन मा पोनि सो यांचे आदेशाने पुढील तपास कामी यांचेकडे दिले |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | क्रांती चौक | 29/2022 कलम 143, 149, 341, 269, 270 भादवी सह कलम-135 महाराष्ट्र पोलीस कायदा | दिनांक 12/02/2022 रोजी 12.00 ते 13.30 वाजे पावेतो क्रांतीचौक ते कदिम मस्जिद सिल्लीखाना रोड औरंगाबाद | दि.12/2/2022 रोजी 18.40वा. | सोपान छगनराव मोहीते, वय-52 वर्ष, धंदा-नौकरी, पोह/1559 नेमणुक पोलीस ठाणे क्रांतीचौक ,औरंगाबाद | 1) मोहम्मद हिशाम उस्मानी, 2) डॉ. कल्याण वैजिनाथ काळे, 3) रविंद्र शिवाजीराव काळे, 4) संदेश दौलतराव बोरसे, 5) मुजाहीद खान एकबाल खान, 6) हसनोद्दीन कट्यारे कुतोबोद्दीन कट्यारे, 7) अनिल त्रिबकदास पटेल,8) जगन्नाथ वैजीनाथ काळे, 9) मोहसीखान अजीज खान,10) शाम रामभाऊ गावंडे, 11) सय्यद हमीद सय्यद रशीद, 12) सय्यद अक्रम सय्यद अब्बास 13) सय्यद राहील सय्यद हबीब, व इतर अनोळखी असे 90 ते 100 स्त्री पुरुष कार्यकर्ते | | | | | सपोनि श्री इंगळे | नमुद ता वेळी व ठिकाणी दिनांक 12/02/2022 रोजी 12.00 ते 13.30 वाजे पावेतो वर नमुद कॉंग्रेसचे कार्यकर्ते यांनी क्रांतीचौक ते कदिम मस्जिद सिल्लीखाना रोड पर्यत गैरकायद्याची मंडळी जमवुन मोर्चा काढुन वर नमुद प्रमाणे घोषणा दिल्या व कदिम मस्जिद सार्वजनिक रोडवर बसुन सार्वजनिक रहदारीस अडथळा निर्माण केला मोर्चा दरम्यान मास्क परिधान केले नाही, सोशल डिस्टिंगचे पालन केले नाही. व मा. जिल्हाधिकारी व मा. पोलीस आयुक्त सो यांचे आदेश क्र 2022 /जि.आ.व्य/ जि.नि.कक्ष/ कावि - 543 दिनांक 09/01/2022 अन्वये व महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37(1) व (3) अन्वये आदेश क्रमांक जा.क्र.विशा-5/आदेश/औबाद/2022-467 औरंगाबाद शहर दिनांक 08/02/2022 अन्वये लागु आदेशाचे उलग्घंन केले. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कलम 143, 149, 341, 269, 270 भारतीय दंड विधान संहीता सह कलम-135 महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये कायदेशीर फिर्याद आहे वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करुन मा. पो.नि. सो यांचे आदेशाने पुढील तपास कामी सपोनि श्री इंगळे यांचेकडे दिला. |
| 9 | दौलताबाद | गुरनं :- 18/2022 कलम 379 भादवी | दि.09/02/2022रोजी सकाळी 07.00 ते दि. 12/02/2022 रोजी दुपारी 02.00 वा. सु. टाकळीवाडी गट नं 32 मध्ये | दि. 12/02/2022 रोजी 15.45 वा. | चंपालाल हिरालाल जारवाल वय 53 वर्षे धंदा नोकरी रा. टाकळीवाडी गट नं 32 ता.गंगापुर जि औरंगाबाद | अज्ञात | | | | | पोना 154 मान्टेया | यातील फिर्यादी यांनी दि.09/02/2022रोजी सकाळी 07.00 वाजेच्या शेतावर गव्हाला व हरबरा या पिकाना पाणी भरले व खाजगी कामा निमित्त फिर्यादी हे पुणे येथे गेले व दि. 12/02/2022रोजी दुपारी 02.00 वा.सु.शेतात पिकाणा पाणी भरण्यासाठी गेले असता आमच्या शेतातील विहीरीवरील व शेतळयावरील पाण्याच्या दोन मोटारी मला दिसुन आल्या नाही व पाईप तुटलेले दिसुन आले. माझ्या शेतातुन चोरीस गेल्या मोटारीचे वर्णन व किंमत खालील प्रमाणेटेस्मो कंपनीचे 5 HP ची व 01 3HP च्या 02 पाण्याच्या मोटार 11000 कि. जु.वा.एकुण11000असा वरिल वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्याने लबाडिच्या ईराद्याने स्वताच्या फायद्यासाठी चोरुन नेल्या आहे म्हणुन बाजुस |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | प्रमाणे गुन्हा दाखल |
| 10 | उस्मान पुरा | 34/22 कलम 324, 504,34 IPC | दिं. 11/02/2022 रोजी 18.00 वा. रेल्वे पटरी जवळ, छोटा मुरलीधरनगर , उस्मानपुरा, औरंगाबाद. | दि 12/02/2022 रोजी 11.52 वा. | विजय विक्रम उमप, वय 40 वर्षे, धंदा वाचमन महाराष्ट्र राज्य वखार मंडळ, रा. छोटा मुरलीधरनगर, रेल्वे फाटका जवळ, औरंगाबाद, | 1) सुरेश विक्रम उमप, वय 42 वर्षे, 2) विक्रम नाथा उमप, वय 60 वर्षे, 3) राहूल सुरेश उमप व 4) विशाल सुरेश उमप, सर्व रा. छोटा मुरलीधरनगर, रेल्वे फाटका जवळ, औरंगाबाद. | - | - | - | | HC/155 जाधव | नमुद ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व आरोपी हे नात्याने भाऊ, वडील व पुतणे असे असुन यातील आरोपीतांनी घराचे वाटणीचे कारणावरून यातील फिर्यादीस शिवीगाळ करून आरोपी क्र. 1 याने फिर्यादीचा गळा पकडून आरोपी क्र. 3 याने त्याचे हातातील चाकुने उजव्या हातावर मारून जखमी केले व आरोपी क्र. 2 व 4 यांनी त्यांचे हातातील लाकडी दांड्याने मारहाण केली म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल |
| 11 | उस्मान पुरा | 36/2022 कलम 454, 457, 380 भा.द.वि. | दिं. 11/02/2022 रोजी 12.30 वा. ते दि. 12/02/2022 रोजीचे 04.38 वा.सु. एकनाथनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद. | दि 12/02/2022 रोजी 15.10 वा | महेंद्र संपतराव त्रिभुवन, वय 48 वर्षे, धंदा नोकरी, रा. बिल्डींग नं. 31, म्हाडा कॉलनी, एकनाथनगर, औरंगाबाद,. | अज्ञात | | 27,000 रू. रोख रक्कम ज्यात 500 रू. दराच्या 54 नोटा व इतर कागदपत्र. | - | - | NPC/886 बऱ्हाटे | खुलासा- नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीताने फिर्यादीचे घराचे दरवाजाचा कडी कोंडा उचकटून आत प्रवेश करून फिर्यादी यांचे घरातील वरील वर्णनाचे व किंमतीची रोख रक्कम व कागदपत्र स्वतःच्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने चोरून नेले म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल |
| 12 | उस्मानपुरा | 37/2022 कलम 65 (ख) म.दा.का | दि. 12/02/2022 रोजी 20.45 वा. गाडे चौक, उस्मानपुरा, औरंगाबाद. | दि 12/02/2022 रोजी 21.10 वा | संदिपान देवीदास धर्मे, वय 30 वर्षे, धंदा नोकरी, PC/2591, ने.पो.स्टे. उस्मानपुरा, औरंगाबाद शहर, | दिपक बलराज टाक, वय 19 वर्षे, रा. पदमपुरा, औरंगाबाद. | | 2,880 रू.किं. च्या 48 देशी दारू भिंगरी संत्रा | | - | ASI/बोडले | . नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपीताने त्याचे ताब्यातील वरील वर्णनाचा व किंमतीचा मुद्देमाल बिना परवाना बेकायदेशीर रित्या चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने बाळगतांना मिळून आला म्हणुन बाजुस कलमा प्रमाणे गुन्हा दाखल |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | एम वाळुज | गुरक्र-104/2022 कलम 420 भादवी | 11/02/2022 रोजी 16.00ते 20.00 | 12/02/2022 रोजी वेळ 03.02 | परभत रामसिंग म्हस्के वय 43 वर्ष, धंदा नौकरी पोना/1555 नेमणुक गुन्हे शाखा,औरंगाबाद शहर. | कबीर खान शेरखान पठाण | | | | | पोह/88 खोसरे | .दिनांक 11/02/2022 रोजी आम्ही व सोबत पो.उप नि.श्री.सानेटक्के साहेब, सफौ जवखेडे, पोशि/2922 धुळे नेम गुन्हे शाखा औरंगाबाद शहर असे शासकीय वाहन क्र.MH 20 CU 0051 या वाहनाने पोलीस आयुक्त हददीतील अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी पेट्रोलींग करीत असताना 16.00 वा तुर्काबाद खराडी ता. गंगापूर येथे आलो असता पोउपनि श्री. सोनटक्के साहेब यांना त्यांच्या गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, अंबेलोहळ येथील एक इसम नामे कबीर खान शेरखान पठाण हा त्याच्या ताब्यातील होंडा कंपनीच्या ड्रीम युगा या मोटार सायकलवर खोटा व बनावट क्रमांक MH 20 BP 9096 हा टाकुन तो गाडी वापरत असुन सदर गाडी ही जिन क्र. JC58ET3465238 असा आहे. सदरची मो.सा. ही. दिनांक 15/02/2021 रोजी पो.स्टे एम.वाळुज हददीतुन चोरीस गेली असुन त्या बाबत पो.स्टे एम.वाळुज येथे गुरनं. 114/2021 कलम 379 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरची मो.सा. ही चोरीची असुन तिच्यावर बनावट व खोटा आर.टी.ओ. नोंदणी क्रमांक टाकल्याचे निष्पन्न झाल्याने गुन्हा दाखल |
| 14 | एम वाळुज | गुरक्र-105/2022 कलम 324,323,504,506,34 भादवी. | दि.11/02/2022रो20.00ते 21.00 | 12/02/2022 रोजी 14.59 | प्रविण साहेबराव राउत वय -28 वर्षे धंदा-खा.नौकरी रा-कमळापुर रोड,न्यु भरत नगर ,रांजणगाव ता गंगापुर जि.औरंगाबाद | प्रशांत भोसले व ईतर दोन ईसम | | | | | पोह/1481गिरी | .दि.11/02/2022रोजी रात्री 08.00वाजेच्या सुमारास मी माझे घरी असताना माझा मावसभाउ नामे रघुवीर विनकरे याचा ओळखीचा मित्र प्रशांत प्रकाश भोसले याने रघुवीरला फोन केला व मला म्हणाला की तु साराकृती जवळ NRB ग्राउंड वर ये मला तुला बोलायचे आहे असे म्हणाल्याने आमच्या ओळखीचा बुद्ध भुषण याचे मोटारसायकलवर मी व माझा मावसभाऊ रघुवीर प्रकाश विनकरे असे आम्ही साराकृती जवळ NRB ग्राउंड,वडगाव को.येथे गेलो असता तेथे प्रशांत भोसले व त्याचे सोबत इतर दोन मुले होती. प्रशांत भोसले हा माझा मावसभाऊ यास म्हणाला की, तु माझ्या जुन्या खाजगी गोष्टीबद्दल कोणाला काही सांगितले का मला एकाजणाने सांगितले आहे.तु खर सांग तेव्हा तेव्हा रघुवीर याने नाही असे |

# पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | म्हटले असता प्रशांत याने आम्हाला शिवागाळ करण्यास सुरवात केली तेव्हा मी समजावत असताना प्रशांत याने त्याच्या जवळ असलेल्या लाकडी काठीने माझ्या डोक्यात मारहाण करुन मला जखमी केले व इतर दोघांनी मला व रघुवीर ला हाताचापटाने मारुन जखमी केले तसेच तुम्ही जर पोलिस स्टेशनला गेले तर तुम्हाला आम्ही बघुन घेवु अशी धमकी दिली.त्यानंतर तिथुन आम्ही पोलिस स्टेशनला तक्रार देण्यासाठी आलो. तेव्हा पोलीसांनी उपचारकामी घाटी दवाखाना औरंगाबाद येथे मेडीकल मेमो देऊन पाठवीले. अशा तक्रारीवरुन गुन्हा दाखल |
| 15 | एम वाळुज | गुरक्र-106/2022 कलम 379 भादवी. | दि 02/02/2021 रोजी 13.00ते 14.30 | 12/02/2022 रोजी 17.53 | ,सोमनाथ बाळु तांबे, वय-26वर्ष,धंदा-शेती , रा.डोणगाव,ता-पैठण, ता.जि.औरंगाबाद | अज्ञात | | 20,000/-रू.किं. स्पेलंडर प्लस कंपमीची मो.सा.क्र MH 20 ER-0969 | | | पोह/642 महाजन | फिर्यादी यांनी फिर्याद दिली की ते जाण्या येण्यासाठी स्पेलंडर प्लस कंपमीची मो.सा.क्र MH 20 ER-0969 ही.दि. 02/02/2022 रोजी दुपारी 01.00 वा सु मी आंबेलोहळ येथे कामानिमीत्ता प्रल्हाद अंकुश रा- दत्त मंदीराच्या समोर आंबेलोहळ ता- गंगापुर, जी औरंगाबाद यांच्या घरी गेलो व त्यांच्या घरासमोर माझी मोसा ही हॅंन्डलक करुन उभी केली व घरात गेलो नंतर पुन्हा दुपारी 02.30 वा सु बाहेर आलो असता, मला माझी मोटार सायकल दिसली नाही. म्हणुन मी तिचा परिसरात व इतर ठिकाणी आज पर्यत शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही तेव्हा माझी खाञी झाली कि कुणीतरी अज्ञात इसमाने स्वताच्या फायद्यासाठी लबाडीच्या इराद्याने माझी मोटरसायकल चोरून नेली आहे. गुन्हा दाखल |
| 16 | एम वाळुज | गुरक्र-107/2022 कलम 379 भादवी. | दि 10/02/22रोजीचे 18.00ते दि 11/02/2022 रोजीचे 07.00वाजे | 12/02/2022 रोजी 18.51 | अतुल नामदेवराव पिंपळकर, वय-41 वर्षे, धंदा-खा. नौकरी रा.नंदनवन कलनी,छावणी ता. जि. औरंगाबाद, | अज्ञात | | 15,000/-रू.किं. एकुण 6 तांब्याच्या अर्थीन च्या पट्टया | | | पोउपनी ओगले | .दि-10/02/2022 रोजी मी आमच्या कंपणीतील माझे नेहमीप्रमाणे काम करुन सायंकाळी 06.00 वा सु घरी जाण्या पुर्वी आमच्या कंपणीतील ट्रान्सफार्मरची पाहणी केली होती तेव्हा ट्रान्सफार्मर सुस्थित होता ,परंतु दि. 11/02/2022 रोजी सकाळी 07.00 वा सु आमच्या कंपणीतील सुरक्षारक्षक नामे विजय बुंगाळे यांनी फोनद्वारे कळवीले की कंपणी परिसरातील पावर हाऊस मधील एकुण 6 तांब्याच्या अर्थीन च्या पट्टया दिसुन येत नाही,त्या कुणीतरी चोरुन नेले असावे त्यावरुन मी माझे सहकारी नामे राहुल बारटक्के यांना सदरची माहीती देवुन पाहणी करण्याचे सांगीतले, त्यांना सुध्दा नमुद 6 ताब्ाच्या पट्टा दिसुन आल्या नाहीत,त्यानंतर मी दुपारी 02.00 वा सु कंपणीत जावुन पाहणी केली असता सदर तांब्याच्या पट्टया दिसुन आल्या नसल्याने आमची खात्री झाली |

पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर येथील दि 13/02/2022 चे गुन्हेआढावा

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | की सदर तांब्याच्या पट्ट्या कोणीतरी अज्ञात चोरट्या ने कंपणीच्या परिसरात प्रवेश करुन चोरुन नेला आहे. गुन्हा |
| 17 | एम वाळुज | गुरक्र-108/2022 कलम 379 भादवी. | दि 04/02/2022 रोजी 05.00ते 10/02/2022 रोजीचे 01.30वाजेपावेतो | 12/02/2022 रोजी 18.51 | ,श्रीपाद चिंतामन श्रीकांत,वय-54वर्ष,धंदा-खा.नौकरी , रा.उल्कानगरी, गारखेडा, ता.जि.औरंगाबाद | अज्ञात | | 1,10,000/- रू.किं. स्क्रप तांब्याची तार | | | पोउपनी ओगले | यातील फिर्याद D-9, Tragen Tecnology Pvt,Ltd,MIDC वाळूज ता-गंगापुर, जी औरंगाबाद येथे HR मनेजर म्हणुन गेल्या 14 महिणे पासुन या पदावर काम करुन त्यातुन मिळणा-या उत्पन्नातुन माझा व माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो.दि-03/02/2022 रोजी मी अंदाजे 05.00 वा सु आमच्या कंपणीच्या परिसरातील मागील बाजुस मोकळया जागेत अंदाजे 600 ते 700 किलो वजनाची स्क्रप तांब्याची तार ठेवलेली होती.त्यानंतर दि-10/02/2022 रोजी दुपारी 1.30 वा सु आमच्या कंपणीतील HR असिसटंट नामे दिपक धाकतोडे यांनी कंपणीतील मी ठेवलेल्या वर नमुद स्क्रप तांब्याची तारेची पाहणी केली असता त्यांना सदर ची स्क्रप तांब्याची तार ठेवलेल्या ठिकाणी एकुण तारेपैकी अंदाजे 250 ते 300किलो वजनाची तार दिसुन आली नाही, त्यामुळे दिपक धाकतोडे यांनी सदरची माहिती मला फोनद्वारे दिली त्यानंतर मी सदर ठिकाणी जावुन पाहणी केली असता मलाही ठेवलेल्या तारापैंकी अंदाजे 250 ते 300 वजनाची तांब्याची तार दिसुन आली नाही त्यावरुन आमची खात्री झाली की सदर स्क्रप तांब्याची तारेची कोणीतरी अज्ञात चोरट्याने कंपणीच्या परिसरात प्रवेश करुन चोरुन नेला आहे |

Sd/-
(विशाल ढुमे)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
पोलीस आयुक्त औरंगाबाद शहर
करिता